
**माहे फेब्रुवारी २०२१ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे ग्रामीण | सिबा डॉबरमन | १) पोहवा/४४३ जी.बी.फापाळे<br>२) पोशि/२६२४ बी एस चौधरी | रांजणगाव पो.स्टे, गुरनं. ४६/२०२१, भादंवि क. ३९५, ३९७, ३४ दि. २९/१/२०२१ रोजी रा.०२.०० वा. चे सुमारास रांजणगाव MIDC पोस्टे च्या हद्दीत दरोडा टाकुन त्यांचेकडील लागडी दांडके व लोखंडी रॉडने घरामधील झोपलेल्या व्यक्तींना मारहाण केली. त्यांचेकडील सोन्या चांदीचे दागिने असा एकुण ७५०००/-किंमतीचा ऐवज पळवुन नेला. सदर घटनास्थळी श्वान सिबा व पो.हवा.गणेश फापाळे आणि पो.शि.बाबासाहेब चौधरी यांनी घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळवरील वस्तुंचा वास श्वान सिबा हिस दिला असता श्वान सिबा हिने घटनास्थळापासुन अडीच कि.मी.मार्ग काढला पुढे रोड असल्याने श्वानाचा तपास काम बंद केला दि.१/२/२०२१ रोजी घेतलेल्या ओळख परेड घेतली असता संशयीत एका इसमावर भुंकुन दर्शविल्याने त्याची चौकशी केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. |




| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | बीड (श्वा पथक उस्मानाबाद चा वापर ला.) | रॅम्बो डॉबरमन | १) पोहवा/११२५ एस पी मुंढे<br>२) पोहवा/११५६ ए एस गणेश | नेकनुर पो.स्टे. गुरनं. २५/२०२१, भादंवि क. ३०२, २०१, ३४ दि.०३/०२/२०२१ रोजी स.०९.३० ते १०.०० वा.सुमारास या गुन्हयामध्ये घटनास्थळी जावुन मयताचे लाल पांढऱ्या रंगाचे शुज चा श्वान रॅम्बो यास वास दिला दिला. श्वान रॅम्बो याने घटनास्थळावरुन जिल्हा परिषद शाळेच्या समोर फिरुन परत अंदाजे ६० फुट अंतरावर असलेले दगड मातीचे घर व जनावराचा गोठा येथे जावुन फिरु लागला व तिथेच घुटमळु लागल्याने सदर घर कोणाचे आहे याबाबत विचारले असता, तेथील लोकांनी ते घर रोहीदास नवनाथ सपकाळ याचे असल्याबाबत सांगितले. असून यातील आरोपीस अटक केली असून त्याने गुन्हा कबुली दिली आहे. अशा प्रकारे सदर गुन्हा उघडकीस आला. |




| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | रायगड | ऑस्कर डॉबरमन | १) पोना/१४४७ एन.पी.माळवी<br>२)पो.हवा/२१३२ एम.बी.निगडे | वडखळ पो.स्टे. गुरनं. १७/२०२१ भादंवि. क. ३०२ दि.०७/०२/२०२१ रोजी रा. २२.३० वा. निगडे आदिवासी वाडी पोस्ट आमटेम, ता. पेन, जि. रायगड सदर ठिकाणी गेलो असता घटनास्थळावरील असलेल्या रक्ताच्या डागाच्या व केस लागलेल्या कोयत्याच्या मुठीचा श्वान ऑस्कर यास वास दिला असता सुमारे ५०० मिटर अंतरावर असलेल्या शेताच्या बांधावरील झोपडीत असलेल्या इसमाच्या अंगावर श्वान ऑस्कर भुंकला असता संशयीत आरोपी नामे वासुदेव एकनाथ नाईक, रा.निगडे, आदीवासी वाडी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन श्वानाचे काम थांबविण्यात आले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | उस्मानाबाद | रॅम्बो डॉबरमन | १) पोहवा/११२५ एस पी मं ुढे<br>२) पोहवा/११५६ ए एस गणेश | वाशी पो.स्टेशन ६१/२०२१ भादंवि कलम ३९४,३९५,३९७,३४ दि.१३/०२/२०२१ रोजी ०३.०० वा. सुमारास सदर घटनास्थळी प्रभारी अधिकारी पो.नि.श्री. उस्मान शेख साहेबांनी ५० फुट अंतरावर एक राखाडी कलरची शाल असून ती आरोपीने वापरलेली आहे. सदर शालचा वास श्वान रॅम्बोस देण्याकरीता आदेश दिल्याने श्वान रॅम्बो घटनास्थळी पासुन ५०० ते ६०० मिटर अंतरावर एका पत्र्याचे (घरासमोर) श्वान रॅम्बो थांबला व भुंकला असल्याने तसा रिपोर्ट मा.पो.नि.शेख यांना दिला. यावरुन त्यांनी ०२ विधी संघर्षीत बालक यांना ताब्यात घेवून गुन्हा कबुल केल्याचे निष्पन्न झाले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | उस्मानाबाद | रॅम्बो डॉबरमन | १) पोहवा/११२५ एस पी मं ुंढे<br>२) पोहवा/११५६ ए एस गणेश | उमरगा पो. स्टे. गु र नं. ९९/२०२१, भा दं वि क. ४५७, ३८०, ५११, ३४ दि. १७/०२/२०२१ रोजी सदर गुन्हयामध्ये घटनास्थळी दोन पर्स व प्लॅस्टीक हॅन्डग्लोज दिसुन आले. पर्सचा वास श्वान रॅम्बोस दिला असता श्वान घरासमोर फिरुन घरामागुन उमरगा शहरातुन हैद्राबाद रोड ओलांडुन आपटै प्लॉट रोडने दक्षिण बाजुस दिड कि.मिटर जावुन एका पडीक विटाचे घरात फिरुन एका खोलीत कपडे पॅन्ट पडलेल्या ठिकाणी जावुन थांबला. सदर ठिक् ाणी कोण राहतो असे लोकांना विचारले असता. श्रीनिवास जनार्धन पाटील राहतो. त्यास ताब्यात घेवुन परत घटनास्थळी श्वान रॅम्बो यास प्लॅस्टीक हॅन्डग्लोजचा वास दिला असता श्वान रॅम्बो महादेव गल्लीतुन एका घराचे जवळ गेला त्या घरात एक इसम दडुन बसला होता. त्यास नाव विचारले असता त्याचे नाव आकाश जगताप असल्याचे सांगितले व पोलीसांनी त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६ | अमरावती | रुबी डॉबरमन | १. पोना/१६८ नितीन वानखेडे<br>२. पोकाँ/१८४६ राहुल वंजारी | बडनेरा पो. स्टेशन, गुरनं. १२२/२०२१ भादंवि कलम ३७९ दि.१३/२/२०२१ रोजी २२.०० वा. ते दि.१४/२/२१ रोजी ०६.०० वा.चे दरम्यान लकडगंज नवी बस्ती बडनेरा या गुन्हयाचे घटनास्थळी काळया रंगाची कानटोपी मिळुन आली होती. त्या टोपीचा वास श्वान रुबी हिस दिला असता घटनास्थळी मिळुन आलेल्या संशयीत ५ लोकांची ओळख परेड घेतली असता कानटोपीच्या वासावरुन श्वान रुबीने विधी संघर्षीत बालक यास ओळखुन दाखविलेनंतर पोलीसांनी त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ७ | ठाणे शहर | साशा डॉबरमन | १)पोहवा/३१४ मनोज कदम | खडकपाडा पो.स्टे. गुरनं.६०/२०२१ भादंवि क. ३०२,३०७ सह भा.ह.का.क. ३,२५,२७ महा. पोलीस अधिनियम ३७(१),१३५ दि.२१/२/२०२१ रोजी ११.४५ वा. चे सुमारास जगदिश म्हात्रे यांचे घरी सापर्डेगाव,कल्यान (प) सदर घटनास्थळी नमुद गुन्हयात वापरण्यात आलेले गावठी बनावट पिस्टलचा श्वानास वास दिला असता घटनास्थळावरील घराचे आवारातील काही इसम होते. त्यांचा वास घेत जावुन एका इसमांचा वास दिल्यानंतर अंगावर झडप घेतल्याने त्यात चौकशी केल्यानंतर तपासाला दिशा देवुन सदरचा गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव /जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ८ | उस्मानाबाद | प्लुटो डॉबरमन | १) पोहवा/५१ एस.पी.ढोणे<br>२) पोना/१५१८ एस.पी.कोरडे | परंडा पो.स्टे. गु.र.नं. ५४/२०२१ कलम ३९४, ३४ हा गुन्हा दि. २१/०२/२०२१ रोजी ०३:१५ वा. चे दरम्यान घडला असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मिळून आलेल्या दोरीचा वास श्वान प्लुटो यास दिला असता श्वान रस्त्याने वास घेत दिड किमी अंतरापर्यंत व महादेव मंदीरापासून पुढे ५०० मीटरपर्यंत गेला तिथे बॅटरी व लोखंडी रॉड मिळुन आला त्यावरून तपासास योग्य दिशा मिळाली व पुढील तपासातील आरोपींना अटक करण्यात येवून गुन्हा उघडकीस आला. |



अशा प्रकारे माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये खुन - ०३, दरोडा ०१, जबरी चोरी - ०२, घरफोडी - ०१, चोरी ०१, असे एकुण ०८ गुन्हे श्वान पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.